## प्रेसनोट

दि. २१/०८/२०२४

**तलाठी कार्यालय रांझे, ता. भोर, जि. पुणे येथील तलाठयावर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | राजगड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३१ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सुधीर दत्तात्रय तेलंग, वय ५६ वर्ष, पद – तलाठी, सजा - रांझे, ता. भोर, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २०,०००/- (वीस हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- (वीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १६/०८/२०२४ रोजी. |
| सापळा दिनांक | दि. २१/०८/२०२४ |

ठिकाण :- दिनांक २१/०८/२०२४ रोजी ग्रामपंचायत शिवापुर आवारात सजा रांझे तलाठी कार्यालयामध्ये, ता.भोर, जि.पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी रांझे गावात वीस गुंठे जागा खरेदी केली होती. तक्रारदार यांचे नावावर सदर जागेची ऑनलाईन फेरफार नोंद ग्राह्य धरण्यासाठी व ७/१२ उता-यावर नोंद घेण्यासाठी तक्रारदार हे लोकसेवक तलाठी सुधीर तेलंग यांना भेटले असता, लोकसेवक सुधीर तेलंग यांनी प्रत्येक गुंठयास रुपये १०००/- प्रमाणे एकुण २०,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक सुधीर तेलंग यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती २०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक तलाठी सुधीर तेलंग यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये २०,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध राजगड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(माधुरी भोसले)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.